

सोलापूर सोशल फाउंडेशन

गरूड झेप सोलापूरची

पर्यटन सप्ताह विषयी अधिक माहितसाठी क्युआर स्कॅन करा

आपल्या गावात-आपल्या शहरात

इतिहास, संस्कृती, निसर्ग आणि परंपरेचा अनोखा संगम

सोलापूर जिल्हा पर्यटन महोत्सव २०२५

चला तर परिवारासह सोलापुरातल्या वैशिष्ट्यपूर्ण ठिकाणांना भेटी द्या..

आणि अनुभवा

सोलापूरची श्रीमंती

सोलापूर जिल्हा धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळे

सोलापूर शहर

सिद्धरामेश्वर मंदिर



https://maps.app.goo.gl/hjGhsTntSrHG2hon6

शिवयोगी, तत्वचिंतक थोर वचनकार सिध्दराम

शिवयोगी श्री सिद्धरामेश्वर हे सोलापूरचे ग्रामदैवत. हे सत्पुरूष ११ व्या शतकाच्या सुमारास सोलापुरात होऊन गेले. ते वीरशैव पंथाच्या शून्यसिंहासनाचे तिसरे उत्तराधिकारी होते. त्याचप्रमाणे गाणपत्य व शाक्त पंथाचे पुरस्कर्ते असल्यामुळे सोलापूर परिसरात त्यांनी अष्टविनायक व अष्टभुजादेवी स्थापन केल्या. सोलापूर शहरात त्यांनी विविध ठिकाणी ६८ लिंगांची स्थापना केली. त्यांनी कन्नड भाषेतील ६८ हजार वचनांची निर्मिती केली. त्यातील १३७९ वचने आज उपलब्ध आहेत. प्रत्येक वचनाच्या शेवटी कपिलसिद्ध मल्लिकार्जुनाचे स्मरण आढळते.

दक्षिण महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकात वीरशैव पंथाच्या भक्तांची संख्या लक्षणीय आहे. सोलापुरातील श्रीसिद्धेश्वर मंदिर आणि परिसर अतिशय सुंदर आहे. अमृतसरचे सुवर्णमंदिर जसे चारही बाजूंनी पाण्याने वेढलेले आहे, तशाच प्रकारची रचना येथे आहे. हे मंदिर सुवर्णमंदिरापेक्षा ३०० वर्षे जुने आहे. उगवत्या सूर्याचे प्रतिबिंब ज्यावेळी पाण्यात पडते, त्यावेळी या तलावाच्या सौंदर्याला एक वेगळीच झळाळी प्राप्त होते. रात्रीच्या वेळी जेंव्हा मंदिरावर विद्युत रोषणाई केली जाते, तेंव्हा त्याचे सौंदर्य अधिकच खुलून दिसते. दरवर्षी जानेवारी महिन्यात सोलापुरात ग्रामदैवत श्रीसिद्धरामेश्वरांची यात्रा भरते. ही यात्रा पाहण्यासाठी व दर्शनासाठी महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात आदी राज्यांतून भाविक येथे येतात. रोज सुमारे दोन–चार लाख लोक उपस्थित असतात. आणि ही यात्रा जवळजवळ तीन आठवड्यांपर्यंत सुरू असते. लोकसभागांतून 'सुवर्ण सिद्धेश्वर' संकल्पना राबवण्यात येत आहे

सोलापूरच्या श्री सिद्धरामेश्वर महाराजांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगांची यादी खालीलप्रमाणे आहे:

श्री अमृत लिंग, श्री पापेश्वर लिंग, श्री पोमेश्वर लिंग, श्री संगमेश्वर लिंग, श्री गोदाडेश्वर लिंग, श्री नंदीकेश्वर लिंग, श्री सिद्धेश्वर लिंग, श्री बाणलिंग, श्री सिद्धलिंगेश्वर लिंग, श्री अमृतलिंगेश्वर लिंग, श्री आनंदेश्वर लिंग, श्री उमालिंग लिंग, श्री संगमेश्वर लिंग, श्री मुक्तेश्वर लिंग, श्री चन्नमल्लिकार्जुन लिंग, श्री मल्लिकार्जुन लिंग, श्री सिद्धलिंग लिंग, श्री पडलिंग लिंग, श्री कल्लु लिंग, श्री पन्नू लिंग, श्री कस्तूरी लिंग, श्री सोमेश्वर लिंग, श्री अंगेरेश्वर लिंग, श्री जटाधारी लिंग, श्री अर्कलिंग लिंग, श्री शंखेश्वर लिंग, श्री वेधलिंग लिंग, श्री कुंभलिंग लिंग, श्री कांता लिंग, श्री आनंदलिंग लिंग, श्री संगमेश्वर लिंग, श्री नागेश लिंग, श्री शंख लिंग, श्री कल्लालिंग लिंग, श्री मुकुट लिंग, श्री पावक लिंग, श्री अर्कलिंग लिंग, श्री मल्लिंग लिंग, श्री चंद्र लिंग, श्री सूर्य लिंग, श्री अमृत लिंग, श्री लिंगेश्वर लिंग, श्री सिद्धलिंग लिंग, श्री पाताळिलंग लिंग, श्री वेणु लिंग, श्री वटवृक्ष लिंग, श्री पिंडी लिंग, श्री जडलिंग लिंग, श्री शिवलिंग लिंग, श्री अर्कलिंग लिंग, श्री कांतिलिंग लिंग, श्री चंद्रलिंग लिंग, श्री सूर्यलिंग लिंग, श्री पाषाणलिंग लिंग, श्री पावकलिंग लिंग, श्री पाताळिलंग लिंग, श्री वेणूलिंग लिंग, श्री वटवृक्षलिंग लिंग, श्री पिंडीलिंग लिंग, श्री शिवलिंगिंग लिंग, श्री अमृतलिंग लिंग, श्री आनंदलिंग लिंग, श्री संगमेश्वर लिंग, श्री उमालिंग लिंग, श्री मुक्तेश्वर लिंग, श्री चन्नमल्लिकार्जुन लिंग, श्री मल्लिकार्जुन लिंग, श्री सिद्धलिंग लिंग, श्री पाडलिंग लिंग, श्री कल्लु लिंग, श्री पन्नू लिंग, श्री कस्तूरी लिंग.

भुईकोट किल्ला



सोलापूर शहरात आल्यानंतर काय पाहावे हा प्रश्नच पडू नये, अशी वास्तू या ठिकाणी दिमाखाने उभी आहे ती म्हणजे किल्ले सोलापूर. ज्या शहरास व किल्ल्यास मध्ययुगीन कालखंडात फार महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. त्या शहरामध्ये इतिहासप्रेमींनी, अभ्यासकांनी आणि हौशी पर्यटकांनी आवर्जून भेट द्यावी असे हे ठिकाण आहे. १६८१ नंतर दक्षिणस्वारीवर आलेल्या औरंगजेबाचा नेहमीच मुक्काम येथे असे. दुसरे बाजीराव पेशवे, सातारचे छत्रपती प्रतापसिंह भोसले १८१८ मध्ये १ महिने येथे राहिले होते. १६३६ मध्ये कर्नाटकात जाताना आणि १६६५ ला विजापूरकरांवर आक्रमण करण्यासाठी जाताना या किल्ल्यात अनुक्रमे शहाजीराजे भोसले आणि छत्रपती शिवराय यांचाही मुक्काम पडला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सिद्धेश्वर तलावाच्या काठावरच हा किल्ला आहे.

https://maps.app.goo.gl/3gAnXMS83vVu4eDh6

इंद्रभुवन इमारत



मनमोहक, देखणे इंद्रभुवन

एकेकाळी महाराष्ट्रात चौथ्या क्रमांकावर आणि देशात बाराव्या क्रमांकावर असलेल्या सोलापूरच्या सौंदर्यात भर घालणारी महानगरपालिकेची सुबक नक्षीकाम असलेली अत्यंत रेखीव, मनमोहक, देखणी इमारत म्हणजे इंद्रभुवन होय. १८९९ मध्ये पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांनी या इमारतीचे बांधकाम सुरू केले. अनेक स्थापत्य शास्त्रांच्या प्रमाणबद्ध मिश्रणातून साकार झालेली सुमारे १५ हजारपेक्षा जास्त चौरस फुटांची ही भक्कम साजिरी इमारत शहराच्या मध्यवर्ती भागात उंचावर मोठ्या डौलाने उभी आहे. जगभरातील उत्कृष्ट इमारतींमध्ये त्याकाळी वापरण्यात आलेले अत्याधुनिक बांधकाम साहित्य या इमारतीत वापरले आहे. बांधण्यासाठी १३ वर्षांचा कालावधी लागला. जगभरातील अनेक देशात अप्पासाहेब वारद यांनी दौरे करून या इमारतीसाठी लागणाऱ्या सुबक आणि आकर्षक वस्तू आणल्या. याशिवाय सोलापुरात पोस्टाचे मुख्य कार्यालय, पासपोर्ट कार्यालय, लक्ष्मी मंडई अशा अनेक ऐतिहासिक वास्तू सुस्थितीत आहेत.

https://maps.app.goo.gl/fQS8AySWK9fLotmR7

चार हुतात्मे



https://maps.app.goo.gl/AKrWht8fyzaS4oPj6

हुतात्म्यांचे शहर

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सोलापूरचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरोधात सोलापुरातील कामगार वर्गाने फार मोठा संघर्ष केला आहे. भारत स्वतंत्र होण्यापूर्वी म्हणजेच १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी सोलापूर शहर ब्रिटिशांच्या नियंत्रणाबाहेर गेले होते. दिनांक ९, १०, ११ व १२ मे १९३० च्या दुपारपर्यंत सोलापूर मुक्त होते. १२ मे १९३० ला ब्रिटिश सरकारने मार्शल लॉ पुकारला. या लष्करी कायद्याच्या आधारे अनेक निरपराध व्यक्तींना शिक्षा करण्यात आली व ठार करण्यात आले.

सोलापूरचे स्वातंत्र्य आंदोलन चिरडण्यासाठी ब्रिटिशांनी मल्लप्पा रेवणसिद्धप्पा धनशेट्टी, जगन्नाथ भगवान शिंदे, अब्दुल रसूल कुर्बान हुसेन व श्रीकिसन लक्ष्मीनारायण सारडा यांना १२ जानेवारी १९३१ रोजी फाशी देण्यात आली. स्वातंत्र्य आंदोलनासाठी आपल्या प्राणांचे बलिदान देऊन सोलापूरचे हे चार हुतात्मे अजरामर झाले. सोलापूरच्या बस स्थानकापासून दीड किलोमीटर अंतरावर हुतात्मा चौकात या चौघांचे पुतळे उभारण्यात आले आहेत. याच ठिकाणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. या इतिहासावरून भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू सोलापूरचा उल्लेख शोलापूर असा करीत असत.

बलिदान चौक आणि हुतात्मा स्तंभ



सोलापूर शहरातील तुळजापूर वेस परिसरात बलिदान चौक आणि हुतात्मा स्तंभाची उभारणी करण्यात आली आहे, जो सोलापूर जिल्ह्यातील १९६१ ते २०११ या काळात वीरगती प्राप्त झालेल्या ४७ सैनिकांच्या बलिदानाची आठवण करून देतो. या स्तंभाला 'हुतात्मा स्तंभ' असेही म्हणतात आणि तो सोलापूर शहरातील एक महत्त्वाचे स्मृती स्थळ आहे.

https://maps.app.goo.gl/YYaTrJzxPfWUGyuM7

कोटणीस स्मारक



शहराचे नाव मोठे करणाऱ्या व्यक्तीमत्वामध्ये डॉ. कोटणीसांचा समावेश आहे. दुसऱ्या महायुध्दामध्ये चीनने भारताकडे जखमी सैनिकांची सेवा करण्यासाठी डॉक्टरांची मागणी केली होती. तेव्हा तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरु यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत नुकतेच वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेले सोलापूरचे डॉ. द्वारकानाथ कोटणीस हे चीनमध्ये गेले. तेथे त्यांनी अत्यंत प्रतिकुल स्थिती अपुऱ्या वैद्यकीय साधनांच्या मदतीने शेकडो चीनी सैनिकांवर उपचार करून त्यांचे प्राण वाचवले. चीन मध्ये डॉ. कोटणीस यांच्या बद्दल कृतज्ञता बाळगत तेथे त्यांच्या नावाने हॉस्पिटल व पुतळे उभारले आहेत. या व्यक्तीमत्वाच्या आठवणी जपणारे हे स्मारक आहे. महानगरपालिकेने या स्मारकाचे जतन केले आहे.

https://maps.app.goo.gl/iEgisLpGqnDDHPAbA

रुपा भवानी मंदिर



https://maps.app.goo.gl/zJ9XjAKAVV6gpxox6

रुपा भवानी हे एक धार्मिक महत्व असलेले मंदिर आहे. सोलापूर शहराच्या मध्यभागापासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर असलेलं हे मंदिर भवानी देवीला समर्पित आहे. ही देवी सोलापूर शहराचे रक्षण करते अशी येथील स्थानिकांची धारणा आहे. मंदिराची उभारणी रूपा भवानीचे भक्त बंडोबा पवार यांनी केली होती. असे म्हटले जाते की शेतात नांगरणी करताना त्यांच्या नांगराला देवीची मूर्ती लागली. तोच देवीचा आशीर्वाद समजून त्यांनी त्याच ठिकाणी देवीचे मंदिर बांधले. मंगळवार व शुक्रवार हया दोन दिवशी देवीसाठी महापूजा केली जाते. मंदिरात पुराणातील कथांचे कोरीवकाम असलेली प्राचीन वास्तुकले आहेत. रूपा भवानी रोड, भवानी पेठ सोलापूर येथील हे मंदिर नवरात्रौत्सवाकरिता विशेष प्रसिद्ध आहे. नवरात्रात जेव्हा हवामान सुखद आणि पर्यटनाला अनुकूल असते तेव्हा रुपाभवानी मंदिराला भेट देण्याचा उत्तम काळ आहे. देवीच्या सन्मानार्थ पालखी मिरवणुकीसह दहा दिवस हा उत्सव चालतो.

वीर तपस्वी मंदिर



https://maps.app.goo.gl/LRQxyxaA64qCfS6F6

सोलापूर शहराच्या जवळ असलेले वीर तपस्वी मंदिर हे एक प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे, जिथे भव्य शिवलिंग आणि अनेक शिवलिंग आहेत. हे मंदिर शांत आणि आध्यात्मिक वातावरणासाठी ओळखले जाते, तसेच नंदीची मोठी मूर्ती आणि नयनरम्य प्रांगण हे या मंदिराचे वैशिष्ट्य आहे. येथे विविध आकारांचे अनेक शिवलिंग आहेत, विशेषतः १००८ शिवलिंगांचा संग्रह लक्षणीय आहे. मंदिराच्या प्रांगणात नंदीची एक भव्य आणि प्रभावी मूर्ती आहे. हे मंदिर शांतता आणि भक्तीचे केंद्र असून, तेथील वातावरण मनाला शांती देते.

श्री मल्लिकार्जुन मंदिर



https://maps.app.goo.gl/NqTTPhBa2QfQ7Kkx9

इ.स. १९१७ मध्ये इंग्रजांच्या काळात सोलापूरच्या भूईकोट किल्यात टोकापर्यंत काही इमारती बुडालेल्या असाव्यात याची शंका तत्कालीन कलेक्टरना आल्याने त्यांना पाहणी केली तेव्हा मंदिराचे काही बुजलेले स्तभ दिसले. म्हणून इ.स.१९१९ मध्ये लार्ड ज गव्हर्नर यांच्या परवानगीने उत्खनन करून शोध घेतला तेव्हा उद्धवस्त अवस्थेत चालुक्य काळातील हिंदू शिवालय व गर्भगृह सापडले. एका शिवसेवकांला मूर्ती व शिवलिंग सापडले. हेच शिवलिंग घेऊन बाळीवेस येथे मंदिर बांधण्यात आले. हे मंदिर पूर्ण दगडी बांधकामचे आहे व भिंतीच्या खालच्या बाजूस नक्षी कामाची पट्टी आहे पुर्वभिमुख असलेल्या या मंदिराचे दगडी स्तंभ अत्यंत कोरीव आहेत. मंदिराचे गाभाऱ्यात छतावर सभामंडपवर फुलांची नक्षी आहे. या मंदिरात एकूण ३२ स्तंभ आहेत. दोन्हीं बाजूस बसण्यासाठी कक्षासानेब आहेत. स्टँभ ताळखडा चौरस्कृती असून तो अत्यंत सुंदर कलाकृती आहे

आजोबा गणपती



https://maps.app.goo.gl/rFSm1GfUHCmHgj348

सोलापुरातील गणेशोत्सवाला १०० वर्षांची परंपरा आहे. सोलापूरच्या आजोबा गणपतीला सुमारे १३२ वर्षांची तेजस्वी परंपरा आहे. धार्मिक कार्यक्रमांतून निर्माण होणारे बळ राष्ट्रीय चळवळीसाठी वापरावे आणि स्वातंत्र्याची चळवळ सामान्य जनतेपर्यंत पोहोचवून तरुणांना संघटित करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी १८९४मध्ये गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्या आधी आठ वर्षे सोलापुरात १८८५ मध्ये शुक्रवार पेठेतील जुन्या पिढीतील मंडळींनी एकत्रित येऊन सार्वजनिक स्वरूपात आजोबा गणपतीची प्रतिष्ठापना केली होती

उत्तर सोलापूर

श्री खंडोबा देवस्थान बाळे



सोलापूरमधील बाळे येथील खंडोबा देवस्थान हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे श्रद्धास्थान असून, येथे मार्गशीर्ष महिन्यात खंडोबाची वार्षिक यात्रा भरते. खंडोबा हे भगवान शिवाचे स्वरूप मानले जातात आणि ते अनेक भटक्या, शेती व पशुपालन करणाऱ्या कुटुंबांचे कुलदैवत आहेत. बाळे येथील यात्रेला 'खंडोबा यात्रा' किंवा 'बाळे यात्रा' म्हणून ओळखले जाते आणि या काळात अनेक भाविक येथे दर्शनासाठी जमतात.

https://maps.app.goo.gl/Xm9xgqU9D7ot3gYr8

सोलापूर विद्यापीठ



https://maps.app.goo.gl/wz14qApjSJwdQswP6

सोलापूर विद्यापीठाची स्थापना १ ऑगस्ट २००४ रोजी झाली आणि त्याचे उद्घाटन ३ ऑगस्ट २००४ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल मोहम्मद फजल यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यापीठाचे मूळ नाव 'सोलापूर विद्यापीठ' असे होते. हिंदीचे प्राध्यापक असलेले इरेश स्वामी हे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. हे विद्यापीठ डिजिटल युनिव्हर्सिटी आहे, असे म्हणतात. राणी अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सोलापूर विद्यापीठास द्यावे, ही मागणी महाराष्ट्रातील धनगर समाजाकडून केली जात होती. ६ मार्च २०१९ रोजी विद्यापीठाला त्यांचे नाव दिले, आणि सोलापूर विद्यापीठाचा 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ' असा नामविस्तार झाला.

सोलापूर विज्ञान केंद्र



https://maps.app.goo.gl/sB8nzw6qHppbuxoT8

सोलापूर रेल्वे स्टेशनपासून ११ किमी अंतरावर असलेले सोलापूर विज्ञान केंद्र हे महाराष्ट्रातील सोलापूर येथील एक शैक्षणिक आणि सांस्कृतिक केंद्र आहे. सोलापूरमधील भेट देण्यासारख्या प्रमुख विज्ञान केंद्रांपैकी हे एक आहे आणि महाराष्ट्रातील तिसरे सर्वात मोठे विज्ञान केंद्र आहे. विज्ञानात विशेष रस असलेल्या मुलांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी हे एक चांगले ठिकाण आहे. वैज्ञानिक तत्त्वे प्रदर्शित करण्यासाठी आणि तारे, अवकाश, चंद्र, न्यूटनचा नियम आणि ज्योतिषशास्त्र याबद्दल जाणून घेण्यासाठी अनेक गॅलरी आहेत.

श्री यमाई देवी मंदिर



https://maps.app.goo.gl/N8H5R4K8NXRNkYYG9

मार्डी येथे यमाई देवीचे पुरातन मंदिर आहे. रंगनाथ स्वामी गोसावी यांनी ८०० वर्षांपूर्वी मंदिरात यमाई देवीची प्राणप्रतिष्ठा केली होती. मार्डी येथील यमाई देवी तुळजापूरच्या तुळजाभवानी आईची मोठी बहीण म्हणून ओळखली जाते. साक्षात आदिशक्तीच्या वास्तव्यामुळे मार्डीला शक्तीपीठांचा वारसा लाभला आहे. तुळजाभवानीच्या दर्शनानंतर यमाई देवीचे दर्शन घेण्याची परंपरा भाविक पाळतात. गुलबर्गा जिल्ह्यातील शेडम चीतापूर जवळील रंगनाथ स्वामी गोसावी हे देवीचे निस्सिम भक्त होवून गेले.

श्री देवी सप्तशती या ग्रंथाचे रचनाकार पद्मशाली समाजाचे कुलदैवत तथा महान शिवभक्त श्री मार्कंडेय ऋषी यांची तपोभूमी म्हणून मार्कंडेय पुराणात मारोडी या गावाचा उल्लेख आढळतो. तेच मारोडी म्हणजे सध्याचे मार्डी गाव आहे. भागवत ग्रंथांमध्येही मार्डीचा उल्लेख आढळतो. सोलापूर जिल्ह्यासह मराठवाड्यातील हजारो भाविक आई यमाई देवीच्या दर्शनासाठी मार्डी येथे येतात.

नान्नज अभयारण्य



नान्नज अभयारण्य याला माळढोक अभयारण्य असेही म्हणतात. हे महाराष्ट्रातील आकारमानाने सर्वात मोठे अभयारण्य आहे व याचे क्षेत्रफळ १,२२९ चौ.कि. मी इतके आहे. यात सोलापूर व नगर जिल्ह्यातील मोठ्या भूभागाचा समावेश होतो. हे अभयारण्य मुख्यत्वे माळढोक या पक्ष्याच्या संरक्षणासाठी तयार केले आहे. कुठल्याही एका पक्ष्यासाठी एवढा मोठा भूभाग संरक्षित करण्याची ही दुमिर्ळ घटना आहे.वर नमूद केल्याप्रमाणे माळढोक हा येथील मुख्य वन्य पक्षी आहे. अत्यंत दुमिर्ळ प्रजाती असलेल्या येथील माळढोकांची संख्या एवढा मोठा भूभाग संरक्षित करूनही अजूनही चिंताजनकरीत्या कमीच आहे. येथे मोठ्या प्रमाणावर काळवीट दिसून येतात. तसेच भारतीय लांडगा येथे आढळून येतो. अशा प्रकारचे जंगल भारतीय लांडग्याचे मुख्य वसतीस्थान असते. इतर प्रमुख प्राण्यांमध्ये खोकड, मुंगूस व तरस येथे आढळून येतात.

https://maps.app.goo.gl/Mq881ERVxEzgooTV8

डाळिंब संशोधन केंद्र



https://maps.app.goo.gl/Dgt9DshTjafXp9HX6

जिल्हयात ७५ हजार एकरवर डाळिंब

डाळिंबाची लागवड १९७४ मध्ये झाली. तीही केवळ २ एकरवर. डाळिंब हे पैसे देणारे पीक होईल असे तेव्हा कोणालाही वाटले नव्हते. १९७२ च्या दुष्काळाने वाताहत झाली. काय करावे, हा प्रश्न होता. तेव्हा कमी पाण्यावर येणारे पीक म्हणून डाळिंबाकडे सांगोला तालुक्यातील शेतकरी वळला. पहिले पीक आले. लाल रंगाचे डाळिंब पाहून मुंबईकर चकित झाले. तेथील व्यापारी, महात्मा फुले कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञानांही या डाळिंबाने चकित केले. गणेश डाळिंब इतके चांगले

येऊ शकते हे कुणालाच खरे वाटले नाही. हळूहळू पुढे दुष्काळी भागातील चित्र बदलू बले. पुढे शरद पवार हे मुख्यमंत्री असताना फळबाग लागवडीला उत्तेजन दिले. बँकांनी कर्जे देण्यास सुरुवात केली. आज जिल्ह्यातील ७५ हजार एकरवर डाळिंब आहे. आज सोलापूर येथे डाळिंबावर संशोधन करणारे राष्ट्रीय स्तरावरील केंद्र आहे. सोलापूर जिल्ह्यातील बोर, डाळिंब आखाती देशात निर्यात होऊ लागली तर कारीची द्राक्षे युरोपात पोहोचली. वार्षीक सरासरी उलाढाल १३०० कोटी आहे.

लोकमंगल शिक्षण संकुल वडाळा



https://maps.app.goo.gl/6iS5CGSbwUmkLRE39

लोकमंगल कृषी महाविद्यालय, वडाळा ही श्रीराम ग्रामीण संशोधन आणि विकास प्रतिष्ठान, वडाळा, एन. सोलापूरची एक घटक संस्था आहे, जी माननीय श्री. सुभाषजी देशमुख यांच्या गतिमान नेतृत्वाखाली कृषी क्षेत्रात दर्जेदार शिक्षण देण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आली होती. हे महाविद्यालय २००७ मध्ये मंजूर आणि स्थापन झाले आणि २००८–०९ शैक्षणिक वर्षापासून सुरू झाले.

कृषी क्षेत्र ही एक आमूलाग्र बदलणारी आणि सतत विकसित होणारी शाखा आहे. नवोपक्रम, अभिमुखता आणि सतत विस्तारणारा पाया हे कृषी क्षेत्रातील नवीनतम विकासासाठी एक मजबूत पाया म्हणून काम करतात. आमच्या महाविद्यालयाचे मुख्य उद्दिष्ट कृषीशास्त्र, फलोत्पादन, मृदा विज्ञान, पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र, अभियांत्रिकी, अर्थशास्त्र, कीटकशास्त्र, अनुवंशशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि विस्तार शिक्षण या विषयांचे शिक्षण देणे आहे जेणेकरून या क्षेत्रातील सुशिक्षित मानवी संसाधनांची वाढती गरज पूर्ण होईल.

कृषी विज्ञान केंद्र खेड



सोलापूरचे कृषी विज्ञान केंद्र खेडे या पत्त्यावर आहे: कृषी विज्ञान केंद्र हे केंद्र कृषी विकास प्रतिष्ठान द्वारे चालवले जाते, जे शेतकरी समाजाच्या तांत्रिक आणि सामाजिक उन्नतीसाठी कार्य करते. येथे शेतकऱ्यांसाठी विविध प्रशिक्षणे, नवीन तंत्रज्ञानाची माहिती आणि कृषी उत्पादने उपलब्ध असतात.

कृषी विज्ञान केंद्राचे मुख्य कार्य:

शेतकऱ्यांना शेतीविषयक तांत्रिक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देणे, नवीन कृषी तंत्रज्ञान, खते आणि बियाणे उपलब्ध करून देणे, शेतकऱ्यांच्या समस्यांवर उपाय शोधणे आणि त्यांचे राहणीमान सुधारणे, शेतकऱ्यांसाठी विविध कृषी उपक्रम आणि कार्यक्रम आयोजित करणे.

https://maps.app.goo.gl/WhG97yFZZZRHStzS8

दक्षिण सोलापूर

हत्तरसंग कुडल



https://maps.app.goo.gl/u8wBsRJJbkGPB6uV9

मराठी भाषेतील पहिला शिलालेख येथे आढळला आहे. २०१८ मध्ये या शिलालेखास १००० वर्षे पूर्ण होत आहेत. यावरून मराठीचा उगम किमान १ हजार वर्षांपूर्वीचा असल्याचे सिद्ध होते.

हत्तरसंग कुडल, मराठीतील पहिला शिलालेख

हत्तरसंग कुडल हे नव्याने विकसित जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळ असून, ते भीमा आणि सीना या दोन नद्यांच्या संगमावर आहे. या ठिकाणी दोन मध्ययुगीन शिवमंदिरे आहेत. त्यातले एक मंदिर हरिहरेश्वर तर दुसरे मंदिर संगमेश्वर. सभामंडप, आलेख, अंतराळ, गर्भगृह, हरिहरेश्वर मंदिर, स्वर्गमंडप आणि रंगमंडप या कलाकृती मनाला आश्चर्य वाटावे अशा आहेत. या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी उत्खननात जगातील एकमेव असे साडेचार टन वजनाची एक शिवपिंड सापडली. त्यावर ३६५ शिवमूर्ती कोरलेल्या आहेत.

पुरातत्त्व खात्याने हरिहरेश्वर मंदिराची मूळ रचना तशीच ठेवत हे मंदिर नव्याने उभारले आहे. उत्खननात सापडलेल्या एखाद्या वारशाची सुमारे ४ कोटी रुपये खर्चुन पुन्हा उभारणी केली जाणे, ही दुर्मिळ घटना आहे. प्राचीनता आणि आधुनिकता यांचा सुरेख संगम पाहायला मिळतो.

साईबाबा मंदिर



https://maps.app.goo.gl/1GtvZz8JTWDcbDFm6

होटगी येथील साईबाबा मंदिर हे सोलापूर जिल्ह्यातील एक प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे, जे होटगी गावाजवळ असलेल्या तलावाजवळ आहे. हे ठिकाण हिंदू भाविकांमध्ये लोकप्रिय असून, या मंदिरात दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येतात, विशेषतः गुरुपौर्णिमेसारख्या उत्सवांच्या वेळी. हे मंदिर सोलापूर शहराच्या जवळच आहे आणि तुळजापूर व पंढरपूर यांसारख्या इतर तीर्थस्थळांना भेट देणाऱ्या लोकांसाठी सोयीचे आहे.

कंदलगाव प्रमुख मंदिर



https://maps.app.goo.gl/nFkkBKcA7ZNxVXqH6

कंदलगांव येथे श्री. केदारेश्वराचे हेमाडपंथी बांधणीचे भगवान शंकराचे प्राचीन मंदिर असून त्यातील गाभारा हा भर उन्हाळ्यात ही थंडगार असतो. हे मंदिर आठ खांबावर उभारले गेले आहे. तसेच गावात विठ्ठल रुक्मिणी, अंबाबाई, सकळेश्वर, बिरोबा, म्हसोबा, गणपती आदी देवी देवतांची प्रेक्षणीय मंदिरे आहेत.

मोहोळ

वडवळ -श्री नागनाथ मंदिर




श्री नागनाथ मंदिर माहिती व इतिहास

ज्यांना न घडे काशी त्यांनी यावे वडवाळाशी असे स्थानमहात्म्य असलेल्या वडवळ येथील श्री नागनाथाचे भव्य व सुबक हेमाडपंथी मंदिर श्री एकलिंग तेली यांनी बांधले आहे. मंदिराला एकूण तीन दरवाजे आहेत. मुख्य दरवाजा मोठा असून इतर दोन दरवाजे लहान आहेत. मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार (याला नागेशभक्त दिल्ली दरबार असे म्हणतात.) मधून भाविक आत येतात. सर्वप्रथम श्री एकलिंग तेली यांची संजीवन समाधी नजरेस पडते. त्यानंतर पुढे श्री नागनाथांचे गाभाऱ्यातील दर्शन होते. गाभाऱ्यात श्रींच्या दोन मूर्ती आहेत. (भाविक यांना थोरला देव व धाकटा देव असे संबोधतात.) याच गाभाऱ्यात श्रींचे स्थान असून श्री नागनाथांनी आपले अवतार कार्य संपवण्यापूर्वी तूरभूजीवर एक उजवे पाऊल याठिकाणी उमटवले आहे. 'तूरभूज' म्हणजे श्रींची मूर्ती ज्यावर ठेवली जाते ते स्थान. श्रींच्या मूर्तीसमोर अखंड तेवत राहणाऱ्या दोन समई आहेत.

https://maps.app.goo.gl/Z6Y7aXbed7WsCGzD8

वडवळ - खर्गतीर्थ



श्रीक्षेत्र वडवळ येथील हे पवित्र खर्गतीर्थ होय. काशीहून पवित्र पाणी येथील खर्गतीर्थात येते. अशी भाविकांची श्रद्धा आहे. श्री नागनाथानी आपल्या हातातील खडगाच्या सहाय्याने या खर्गतीर्थाची निर्मिती केली, असा उल्लेख येथील ग्रंथात आढळतो. श्री नागनाथ मंदिराच्या पश्चिमेला ओढ्यालगत सुरेख बांधकाम शैलीचा उत्कृष्ट नमुना असलेले हे खर्गतीर्थ भाविकांचे श्रद्धास्थान आहे. श्रींच्या वार्षिक यात्रेतील तेल लावणे, खर्ग, गण हे सोहळे याठिकाणी होतात. पूर्णतः दगडी बांधकाम असलेल्या या खर्गतीर्थात सुरेख पायऱ्या आहेत. मध्यभागी दगडी चबुतरा असून भाविक त्याला 'बिंडा' म्हणतात. यात्रेतील 'खर्ग' व 'गण' या सोहळ्यात या बिंडावरच गुरु-शिष्यांची कडकडून भेट होत असते. खर्गतीर्थात भक्तांना बसण्यासाठी २१ ओवऱ्या आहेत. ठिकठिकाणी विविध देव-देवतांची मूर्ती सुबकपणे कोरलेल्या आहेत. श्री नागनाथभक्त अज्ञानसिद्ध यांनी याच ठिकाणी तपश्चर्या केलेली छोटीशी गुहा देखील या ठिकाणी आहे. या गुहेच्या प्रवेशद्वारातच माता जगदंबा हिंगुला, बगला यांची मूर्ती आहे. नवरात्रौत्सवात महिला मोठ्या भक्तिभावाने इथे दर्शनासाठी येतात. त्याचबरोबर खर्ग सोहळ्याच्या आदल्या दिवशी गावातील सर्व महिला रात्री याच खर्गतीर्थात स्नान करून श्रींच्या मंदिरात दंडवत घालत श्रींचे मनोभावे दर्शन घेतात.

https://maps.app.goo.gl/GiVxF4GLCPr6rbrJ8

अक्कलकोट

श्री स्वामी समर्थ



https://maps.app.goo.gl/BHNTyL1gf4V9BMJf9

स्वामी समर्थांचा मंत्र : भिऊ नको, मी तुझ्या पाठीशी आहे

सोलापूर शहरापासून ४० किमी अंतरावर असलेले अक्कलकोट शहर श्री स्वामी समर्थ महाराजांचे स्थान म्हणून प्रसिद्ध आहे. दत्तात्रयाचे अवतार मानले गेलेल्या समर्थांचा एकूण कार्यकाळ ४० वर्षांचा आहे. त्यापैकी २१ वर्षे त्यांचे वास्तव्य अक्कलकोट येथे होते.

महाराष्ट्रासह कर्नाटक व आंध्र प्रदेशातील भक्तांची या ठिकाणी कायम वदर्ळ असते. महाराष्ट्रतील प्रामुख्याने पुणे, मुंबई, ठाणे, डोंबिवली, नाशिक व संभाजीनगर (औरंगाबाद) शहरातील भक्तसंख्या प्रामुख्याने जास्ती आहे. स्वामी समर्थ ज्या वडाच्या झाडाखाली बसून ध्यानधारणा करत त्या ठिकाणी आता मंदिर बांधण्यात आले आहे. त्याला वटवृक्ष देवस्थान म्हणून ओळखले जाते. श्री स्वामी समर्थांची पवित्र समाधी महाराजांच्या इच्छेप्रमाणे त्यांचे शिष्य श्री चोळप्पा यांच्या घरात आहे. हे ठिकाण समाधीमठ म्हणून ओळखले जाते. येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने रोज दुपारी व रात्री हजारो लोक प्रसादाचा लाभ घेतात. देवस्थान आणि अन्नछत्र मंडळाकडून दोन भक्तनिवासांची सोय करण्यात आली आहे. दरवर्षी चैत्र शुद्ध त्रयोदशीला स्वामी समर्थांची पुण्यतिथी साजरी केली जाते.


शिवपुरी



शिवपुरी हे अग्निहोत्राचे उगमस्थान मानले गेले आहे. वैदिक जीवनपद्धतीद्वारे समस्त भूमंडलावर सुखसमृद्धी आणि शांती प्रस्थापित व्हावी अशी अग्निहोत्रामागची मूळ संकल्पना आहे. भारतासह जगातील ७० देशांमध्ये अग्निहोत्राचा प्रसार झालेला आहे. श्री वटवृक्ष स्वामी महाराज पीठाचे अधिष्ठान लाभलेल्या श्री गजानन महाराज यांनी वायुमंडल शुध्दीसाठी अग्निहोत्र यज्ञाचे पुनरुज्जीवन केले. अक्कलकोटमधील शिवपुरीच्या अग्निहोत्र यज्ञाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली. अग्निहोत्र प्रसार आणि संशोधन कार्याबरोबरच शिवपुरीत आयुर्वेदिक शास्त्रीय पंचकर्म केंद्र, अन्नदान, गो संवर्धन, मोफत आरोग्य शिबिर आदी चालते. येथे श्री गजानन महाराज समाधी, शिवालय आणि भगवान परशुरामाचे मंदिर यांचे दर्शन लाभते.

https://maps.app.goo.gl/69UqkHbveSjvjdjq8

दुर्मिळ शस्त्रागार



https://maps.app.goo.gl/A317rkLNx5uwt4W36

अक्कलकोटनगरीत गेल्यानंतर आवर्जून भेट दिली पाहिजे असे ठिकाण म्हणजे दुर्मिळ शस्त्रागार होय. एका व्यक्तीने उभारलेले आशिया खंडातले हे सर्वात मोठे शस्त्रागार.

अक्कलकोटचे संस्थान छत्रपती शाहू महाराजांच्या साताऱ्याच्या गादीबरोबर आकारास आले. राजे फत्तेसिंह भोसले हे शाहूंचे मानसपुत्र. ते या संस्थानचे पहिले राजे! ती गोष्ट १७०७ सालची. पुढे १८९६ ते १९२३ मध्ये फत्तेसिंह भोसले (तिसरे) हे राजे होऊन गेले. त्यांचे कर्तृत्व मोठे होते. त्या राजाच्या काळातच अक्कलकोटचा नवा राजवाडा आणि त्यांचे शस्त्रागार उभे राहिले. राजवाड्याच्या पहिल्या मजल्यावर शस्त्रागार आहे. राजे फत्तेसिंह भोसले (तिसरे) यांना वेगवेगळी शस्त्रे जमवण्याचा छंद होता. त्यांना अवघे अठ्ठावीस वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांनी रणांगणावर पराक्रम गाजवलाच, त्याबरोबर असंख्य शस्त्रेही जमवली. त्या संग्रहातून अक्कलकोटचे हे शस्त्रागार १९२२ मध्ये आकाराला आले. सुरुवातीची अनेक वर्षे संग्रहालय अक्कलकोटचा जुन्या किल्लेवजा राजवाड्यात होते, ते सुरक्षिततेच्या कारणास्तव २००२ मध्ये नव्या राजवाड्यात हलवण्यात आले. अकराशे तलवारी, दोनशेहून अधिक बंदुका, तेवीस लहानमोठ्या तोफा, बावन्न पिस्तुले; तसेच, कट्यार, गुप्ती, बिचवे, खंजीर, भाले, परशू, अंकुश, वाघनखे, बाण आणि आणखी कितीतरी...त्या हत्यारांचे वैविध्य आणि संख्याबळच प्रेक्षकाचे डोळे दीपवून टाकते. ते आशियातील मानाचे शस्त्र संग्रहालय मानले जाते.

माढा


चिंचगाव टेकडी



https://maps.app.goo.gl/BHNTyL1gf4V9BMJf9

चिंचगाव टेकडी हे सोलापूर जिल्ह्यामधील माढा तालुक्यात असलेले एक ठिकाण आहे, जिथे परमपूज्य स्वामी रामानंद सरस्वती महाराज यांनी १९६२ मध्ये वास्तव्य केले. त्यांनी टेकडीवरील महादेव मंदिराचा विस्तार केला आणि सत्संग आश्रमची स्थापना केली, जे आता एक प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. स्वामीजींचे २०२१ मध्ये देहावसान झाले असून, त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ तेथे सत्संग आश्रम ट्रस्टचे कार्य सुरू आहे. स्वामी रामानंद सरस्वती हे आध्यात्मिक, वक्ते आणि बहुभाषिक होते. त्यांच्या शिकवणी आणि योग्यांच्या कार्यामुळे चिंचगाव टेकडी हे एक आध्यात्मिक केंद्र म्हणून ओळखले जाते. चिंचगाव टेकडी हे एक लोकप्रिय धार्मिक पर्यटन स्थळ आहे, जेथे अनेक भक्त आणि भाविक यात्रेस येतात. आजही ट्रस्टच्या माध्यमातून स्वामीजींचे कार्य सुरू आहे. येथे विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

संत सावता माळी



संत सावता माळी (जन्म : इ.स. १२५०; समाधी : इ.स. १२९५) हे एक मराठी संतकवी होते. अरण (तालुका–माढा; जिल्हा–सोलापूर) हे सावतोबांचे गाव होय. दैवू माळी हे सावता महाराजांचे आजोबा म्हणजे वडिलांचे वडील होते. ते पंढरीचे वारकरी होते. त्यांना दोन मुले होती. पुरसोबा आणि डोंगरोबा. पुरसोबा हे धार्मिक वळणाचे होते. शेतीचा व्यवसाय सांभाळून ते भजन–पूजन करीत असत. पंढरीची वारी करीत असत. त्यांचा विवाहही त्याच पंचक्रोशीतील सदू माळी यांच्या मुलीशी झाला. या दांपत्याच्या पोटी सावतोबांचा जन्म झाला. या घराण्याचे मूळ गाव मिरज संस्थानातले औसे होय. दैवू माळी (आजोबा) अरण या गावी स्थायिक झाले. जातात.

https://maps.app.goo.gl/vGzQU32jMXXQ8hLu6

संत कूर्मदास



संत कूर्मदास हे विठ्ठल भक्त होते, जे जन्माने शारीरिक व्यंग असलेले होते, कारण त्यांना गुडघ्यांपासून पाय आणि कोपरांपासून हात नव्हते. असे असूनही, त्यांनी केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर पंढरीची वारी केली आणि पंढरीच्या विठ्ठलाचे दर्शन घेतले, ही त्यांची भक्ती आणि दृढनिश्चयाची कथा प्रसिद्ध आहे. ते एका भानुदासांच्या कीर्तनादरम्यान होते, जिथे त्यांनी वारी करण्याची इच्छा व्यक्त केली. शारीरिक व्यंग असतानाही त्यांनी आपल्या भक्तीच्या जोरावर पंढरीची वारी केली, जी एक अविश्वसनीय गोष्ट मानली जाते. या शारीरिक व्यंगामुळे ते विठ्ठलाला भेटू शकणार नाहीत, असे वाटले होते. परंतु, त्यांच्या अढळ भक्तीमुळे आणि सतत पांडुरंगाचा धावा केल्याने साक्षात पंढरीचा पांडुरंग त्यांच्या भेटीला आला, असे मानले जाते. कार्य सुरू आहे. येथे विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

https://maps.app.goo.gl/jspTumB3jZNDBQSt5

पंढरपूर

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर पंढरपूर




https://maps.app.goo.gl/tCHFf1dhBLopq7cD9

पंढरपूरला दक्षिणेची काशी म्हटले जाते. महाराष्ट्र, कर्नाटक आंध्र, तामिळनाडू आणि मध्य प्रदेश या राज्यांतून पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक येत असतात. आषाढी, कार्तिकी, माघी आणि चैत्री अशा पंढरपूरच्या चार यात्रा प्रसिद्ध आहेत. पहिल्या शतकापासून ते अस्तित्वात आहे असे मानले जाते. पंढरपुरात विठ्ठल टेकडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उंचावरच्या भागात हे पुरातन मंदिर आहे. महाराष्ट्रातल्या बहुसंख्य संतांचे आराध्यदैवत असलेल्या या विठ्ठलाची मूर्ती या मंदिरात आहे. हे तीर्थक्षेत्र भीमा नदीच्या काठावर आहे. पण पंढरपुरात आली म्हणजे ही भीमानदी चंद्रकोरीचा आकार धारण करते म्हणून तिला येथे चंद्रभागा म्हटले जाते.

श्री विठ्ठल हा श्रीकृष्णाचाच अवतार आहे, पण तो भक्त पुंडलिकाच्या हट्टापायी स्वतः पंढरपुरात येऊन अठ्ठावीस युगांपासून विटेवर उभा आहे. देवाला पंढरपुरात येता येत नव्हते पण रुसून निघून गेलेल्या रुक्मिणीला शोधण्यासाठी देव येथे आला अशी आख्यायिका आहे. या मंदिरात विठ्ठलाची आणि रुक्मिणीची मूर्ती एकत्र नाही. या मंदिराच्या समोर असलेल्या वाळवंटात अनेक संतांनी कीर्तने केलेली आहेत आणि येथेच तेराव्या शतकात महाराष्ट्रातल्या आध्यात्मिक क्रांतीची पहिली पावले उमटली आहेत.

यमाई तलाव व तुळशी वृंदावन



पंढरपूर येथील यमाई तलावाजवळ एक सुंदर ठिकाण आहे, ज्याचे नाव तुळशी वृंदावन आहे. या ठिकाणी विठ्ठलाची २५ फूट उंच मूर्ती आहे, विविध रंगांची फुले आणि रंगीबेरंगी कारंजे आहेत. यमाई तलाव हा पंढरपूरमधील एक जुना तलाव आहे, जो पिण्याच्या पाण्याच्या सोयीसाठी १८७४ मध्ये तयार करण्यात आला होता. विठ्ठलाची २५ फूट उंच भव्य मूर्ती. विविध प्रकारची फुलझाडे आणि रंगीबेरंगी कारंजे. निसर्गरम्य आणि शांत वातावरण. तुळशी वृंदावनाशेजारीच यमाई तलाव आहे, जिथे पर्यटक शांतपणे फिरू शकतात.

https://maps.app.goo.gl/PMkXVnER8mykPKsLA

श्री पुंडलिक मंदिर, पंढरपूर



चंद्रभागा नदीच्या काठावर वसलेले पुंडलिक मंदिर याला नक्की भेट द्या.

https://maps.app.goo.gl/Qrd8wdZYjmxWwmey9

चंद्रभागा नदी



विठ्ठल मंदिरापासून जवळच चंद्रभागा नदी वाहते. चंद्रभागा नदीत स्नान केल्याने सर्व पापांपासून मुक्ती मिळते असे मानले जाते. भिमा नदीचा आकार येथे चंद्रासारखा झाला आहे म्हणून तिला येथे चंद्रभागा म्हणून ओळखतात.

https://maps.app.goo.gl/zPUt5eg97fj2H6er6

प्रभुपाद घाट



ISCKON या संस्थेमार्फत चंद्रभागेच्या तीरी प्रभुपाद घाटाची निर्मिती करण्यात आली आहे. अतिशय सुंदर व मनमोहक अशी घाटाची रचना केली आहे. येथे रोज दुपारी १२ वाजता ISCKON संस्थेमार्फत मोफत अन्नदान केले जाते.

https://maps.app.goo.gl/quFsiWzURgFWWpgu8

श्री श्री राधा पंढरीनाथ मंदीर



पंढरपूर मध्ये आलाय तर isckon temple ला भेट द्यायला विसरू नका. राधा कृष्णाचे मनमोहक रूप पाहून मन अगदी प्रसन्न होते. दुपारी १ ते ४ या वेळेत वेळेत मंदीर बंद असते. येथे जवळच गोशाळा आहे. व राहण्यासाठी भक्त निवास ही आहे.

https://maps.app.goo.gl/RT78peqf7xZodj3T9

श्री द्वारकाधीश मंदीर



विठ्ठल मंदिरापासून चंद्रभागा नदीकडे जाताना हे मंदीर आहे.

https://maps.app.goo.gl/aYEUtDsgTgCbCvZ67

चंद्रभागा मंदिर, पंढरपूर



या मंदिराला श्री कृष्ण चैतन्य चंद्रभागा मंदिर असे म्हणतात. चंद्रभागा नदीच्या काठावर प्रभुपद घाटाजवळ हे सुंदर मंदीर आहे.

https://maps.app.goo.gl/9YaJDUNHLmSi6LGj8

कैकाडी महाराज मठ, पंढरपूर



कैकाडी महाराज मठ या ठिकाणी आपल्याला विविध धार्मिक प्रतिकृती पाहायला मिळतात. चार धाम, ऋषी–मुनी, विविध धार्मिक प्रसंग यांच्या प्रतिकृती येथे

https://maps.app.goo.gl/9Ti6eaGn5QEHuUgk8

गजानन महाराज मंदिर, पंढरपूर



गजानन महाराज संस्थान, शेगांव ट्रस्ट तर्फे पंढरपूरमध्ये या उत्कृष्ट मंदिराची स्थापना करण्यात आली आहे. हे मंदीर संपूर्ण व्हाइट मार्बल मध्ये बनवलेले आहे. या मंदिराशेजारी राम मंदीर सुद्धा आहे त्यालाही अवश्य भेट द्या.

https://maps.app.goo.gl/PGuQH75TbfeyVsJs7

तनपुरे महाराज मठ, पंढरपूर



पंढरपूर मधील हा एक सुप्रसिद्ध मठ आहे. येथे मठात देवीदेवतांच्या काही भव्य प्रतिकृती साकारण्यात आल्या आहेत

https://maps.app.goo.gl/GBquDBunvW4Vx4UH8

करमाळा

कमला भवानी देवीचे प्रसिद्ध मंदिर



https://maps.app.goo.gl/AfcYyngrvfUxxmGDA

महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथे कमला भवानी देवीचे प्रसिद्ध मंदिर आहे. नवरात्री उत्सवात देशभरातून भाविक या ठिकाणी दर्शनासाठी येत असतात.कमला भवानी मंदिराचे बांधकाम इसवीसन १७२७ च्या सुमारास सुरु करण्यात आले असावे असे अनुमान आहे.

कमलाभवानी मंदिर हेमाडपंथी शैलीतील असून मंदिरातील बांधकामावर मुघली बांधकाम शैलीचाही प्रभाव असल्याचे दिसते. या मंदिराचे प्रवेशद्वार दक्षिण पूर्व आणि उत्तर दिशेला आहे. या मंदिराची आखणी ८० एकर परिसरात केली असून या मंदिराला एकूण ५ दरवाजे आहेत तर दारावर गोपुरे आहे. उंच टेकडीवर असलेल्या या मंदिरात प्रवेश करण्यासाठी पायथ्यापासून प्रवेशद्वारापर्यंत दगडी पायऱ्यांची चढण आहे.

'सैराट' चित्रपटातील विहीर



'सैराट' चित्रपटातील विहीर ही सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील एका जुन्या हत्ती बारव विहिरीवर आधारित होती, जी तिच्या अद्वितीय वास्तुकलेसाठी प्रसिद्ध आहे. 'याड लागलं' या गाण्यात दाखवलेली ही विहीर परशाच्या उडीमुळे खूप चर्चेत आली होती आणि नंतर ती एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ बनली.

विहिरीची वैशिष्ट्ये:

ही विहीर एक ४०० वर्षे जुनी वास्तू आहे.

तिची स्थापत्यकला अद्वितीय असून ती पर्यटकांना आकर्षित करते.

चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर या विहिरीकडे लोकांचे लक्ष वेधले गेले.

या विहिरीमध्ये अनेक लोकं गर्दी करत असत.

या विहिरीमुळे, 'सैराट' चित्रपट अधिक लोकप्रिय झाला.

https://maps.app.goo.gl/jo6QLXp9gcwPpNeKA

उजनी धरण



https://maps.app.goo.gl/AfcYyngrvfUxxmGDA

उजनी धरण हे भीमा नदीवरील एक मोठे धरण आहे, ज्याची निर्मिती सोलापूर, पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी झाली आहे. या धरणाच्या जलाशयाला 'यशवंत सागर' म्हणतात आणि ते पक्षी निरीक्षणासह पर्यटनासाठीही प्रसिद्ध आहे. धरणाच्या बॅकवॉटरमध्ये अनेक गावे आहेत, ज्यामुळे तेथील शेतकरी आणि अर्थव्यवस्थेला फायदा होतो.

महत्व: पक्षी निरीक्षण: हिवाळ्यामध्ये अनेक पक्षी, विशेषतः फ्लेमिंगो (रोहित पक्षी), उजनीच्या बॅकवॉटर परिसरात येतात, ज्यामुळे ते एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ बनते.

शेती: उजनी बॅकवॉटर परिसरातील शेतकऱ्यांसाठी हे पाणी सिंचनासाठी वापरले जाते, ज्यामुळे तेथील शेतीला मोठा फायदा होतो.

पर्यटन: भिगवण, टेंभूर्णी, जेऊर आणि भिगवण यांसारख्या भागांमध्ये उजनी बॅकवॉटर पर्यटन केंद्र म्हणून विकसित झाले आहे.

मत्स्यपालन: धरणाच्या मोठ्या जलसाठ्यामुळे मत्स्यपालनाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो.

शनेश्वर महाराज मठ - पोथरे



https://maps.app.goo.gl/81nchmeAjpxVQje28

सोलापूर जिल्ह्यातील मौजे पोथरे हे गाव करमाळ्यापासून पाच किलोमीटरवर आहे. गावची लोकसंख्या सुमारे चार हजार आहे. ते गाव करमाळा–जामखेड व पुढे बीड असा प्रवास करताना रस्त्याच्या पश्चिमेकडे वसलेले दिसते. गावात प्रवेश करताना शनेश्वर देवस्थानाची लोखंडी कमान दृष्टीस पडते. पुढे, थोड्या अंतरावर पुरातन वास्तू दिसून येते. ती वास्तू शनेश्वर मठ या नावाने ओळखली जाते. मोठमोठ्या दगडांतून साकारलेली ती वास्तू भक्तांचे, पर्यटकांचे, प्रवाशांचे लक्ष खिळवून ठेवते. वास्तू कधी बांधली गेली त्याबाबत निश्चित माहिती नाही. शनेश्वराचा मठ म्हणजे एक छोटा किल्लाच आहे. अहमदनगर जिल्ह्यातील शनिशिंगणापूर हे शनिदेवाचे गाव भारताच्या नकाशावर झळकले, प्रसिद्ध झाले. त्या गावात शनेश्वर मंदिराच्या ठिकाणी दगडी शिळा आहे; परंतु पोथरे गावातील शनेश्वर यांच्या मठात अखंड अशी शनेश्वराची पुरातन मूर्ती आहे. मठ ही स्वतंत्रपणे देखणी वास्तू आहे. तो मठ नदीच्या पाण्याच्या उपलब्धतेमुळे त्या गावात नदीकाठी बांधला गेला असावा. मठाचे मुख्य द्वार अथवा दिंडी दरवाजा हा उत्तरेकडे, नदीच्या दिशेने तोंड करून उभा आहे. त्याची पडझड झाली आहे. घोटीव दगडातून बनवलेली मठाची सुंदर वेस पर्यटकांचे लक्ष वेधून घेते. त्या वेशीमधून आत जाण्यासाठी मुख्य द्वार होते.

बार्शी

संतनाथ मंदिर




वैराग हे त्या गावाचे नाव, गावाची सांस्कृतिक–सामाजिक वैशिष्ट्ये जपणारे आहे. ते सोलापूर जिल्ह्याच्या बार्शी तालुक्यात येते. फार पूर्वीपासून तेथे वैरागी लोकांची गर्दी होती, म्हणून ते वैराग. श्रीसंतनाथ महाराज ही वैरागची ग्रामदेवता मानली जाते. त्याचबरोबर, ती नगरी श्री व्यंकोबाबा, श्री दयानंदबाबा वगैरे काही सिद्धपुरुषांच्या वास्तव्याने पावन झालेली मानली जाते.

वैराग हे मोगलशाही हद्दीतील, निजामशाहीच्या सीमेलगतचे पहिले गाव. निजामाच्या राज्यातून मोगल सीमेत येण्यासाठी भरावा लागणारा जकात गोळा करण्यासाठीचा दगडी रांजण खुंटेवाडीनजीक शिवारात आढळतो.

https://maps.app.goo.gl/UYT53JWN6dPqd6Lo6


भगवंत मंदिर



बार्शी शहर भगवंत मंदिरासाठी प्रसिध्द आहे. भगवंत मंदिर श्री विष्णुला समर्पित आहे. ह्या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण भारतात श्री विष्णुला भगवंत या नावाने ओळखले हे एकमेव मंदिर आहे. हे मंदिर ई स १२४५ मध्ये हेमाडपंथी कला शैलीत बांधले गेले. मंदिराला चार दिशांनी चार प्रवेश द्वार आहेत पण मुख्य प्रवेश द्वार हे पूर्वाभिमुख आहे. गर्भ गृहा समोर गरुड खांब आहे. श्री भगवंताची मूर्ती काळ्या पाषाणाची असून भगवंताच्या हातात शंख, चक्र व गदा आहेत. राजा अंबरीश ची मूर्ती भगवंताच्या उजव्या हातास आहे. श्री लक्ष्मी भगवंताच्या पाठीमागे आहे. भगवंताच्या कपाळा वर शिवलिंग असून छातीवर भृगू रीशीच्या पायाचे ठसे आहेत.

https://maps.app.goo.gl/N1X1zhyaQj1f8n4D9

जैन मंदिर



बार्शी (जि. सोलापूर) येथे विविध जैन मंदिरे आहेत, ज्यात श्री पार्श्वपुरम श्वेतांबर जैन मंदिर तीर्थ, श्री जैन श्वेतांबर ऋषभदेव मंदिर आणि महावीर भगवान जैन मंदिर यांचा समावेश होतो. ही मंदिरे शांत आणि सुंदर असून, जैन यात्रेकरूंसाठी एक महत्त्वाचे ठिकाण आहेत.

मंदिरांची वैशिष्ट्ये:


ही मंदिरे सुंदर आणि शांत वातावरणासाठी ओळखली जातात.

येथे पद्मावती माता, सरस्वती देवी, ओसिया मां यांच्यासह इतर देवतांच्या मूर्तीही आहेत.

बार्शी हे जैन यात्रेकरूंसाठी अनुकूल ठिकाण आहे.

https://maps.app.goo.gl/sJ9QbFo1NE9bxPeD7

धामणगाव – 'धाकटी पंढरी' – श्री संत माणकोजी बोधले महाराजांचे संजीवन समाधी स्थळ



धामणगाव हे बार्शी तालुक्यातील 'धाकटी पंढरी' म्हणून प्रसिद्ध आहे, जिथे श्री संत माणकोजी बोधले महाराजांचे संजीवन समाधी स्थळ आहे. पंढरपूरच्या यात्रेसाठी वारकऱ्यांना जाणे शक्य नसेल, तेव्हा त्यांच्यासाठी पांडुरंगाने स्वतः धामणगावात येऊन दर्शन दिल्यामुळे या स्थळाला 'धाकटी पंढरी' म्हणतात.

हे स्थळ श्री संत माणकोजी बोधले महाराज यांचे संजीवन समाधी स्थळ आहे.

माहात्म्य:

एका विठ्ठलभक्त स्त्रीच्या श्रद्धेमुळे पांडुरंगाने तिला प्रत्यक्ष दृष्टांत देऊन सांगितले की, 'तुला पंढरीला येण्याची गरज नाही, मीच धाकटी पंढरीत येईन'. त्यामुळे याला 'धाकटी पंढरी' म्हणून ओळखले जाते.

यात्रा:

येथे 'गुरुपौर्णिमा' आणि इतर निमित्ताने मोठी यात्रा भरते आणि यात्रेसाठी भाविक गर्दी करतात.

https://maps.app.goo.gl/kRceMeCZKMUZ1ZXPA


श्री म्हंकाळेश्वर मंदिर



सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात वसलेले सासुरे गाव म्हणजे इतिहास आणि परंपरेचा एक अनमोल ठेवा. हजारो वर्षांचा सांस्कृतिक वारसा आणि पौराणिक महत्त्व असलेल्या या गावाची ओळख महाराष्ट्राच्या संस्कृती कोषात अजरामर आहे. सासुरे गावातील श्री म्हंकाळेश्वराची देवता आणि त्याची जागृत यात्रा पंचक्रोशीत भाविकांसाठी श्रद्धेचे, भक्तीचे, आणि उत्साहाचे केंद्रबिंदू ठरली आहे. दरवर्षी कार्तिकी पौर्णिमेला होणाऱ्या या यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे टोपाचा छबिना, जो भक्तांच्या आस्थेला अधिक उंचीवर नेतो. एकदा सासुरे गावाची यात्रा पाहिल्यानंतर भाविकांचा या यात्रेशी वारंवार जोडला जाणारा अनुभवच गावाचे अस्सल परंपरा व सांस्कृतिक महत्व अधोरेखित करतो.

https://maps.app.goo.gl/NJGFBLUvMDzLvXiGA

श्री नीलकंठेश्वर मंदिर - चिंचोली



चिंचोली (जि. सोलापूर) येथील श्री नीलकंठेश्वर मंदिर हे मराठवाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ बालाघाट पर्वतरांगेत असलेले एक प्रसिद्ध महादेव मंदिर आहे. या मंदिराला नीलकंठेश्वर हे नाव बालाघाटात उगम पावणाऱ्या नीलकंठा नदीमुळे मिळाले आहे आणि या शिवलिंगाची स्थापना प्रभू श्रीरामांनी केल्याची आख्यायिका आहे. हे मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान असून, विशेषतः श्रावणी सोमवारी येथे मोठी गर्दी असते.

स्थान:हे मंदिर बालाघाट पर्वतरांगेच्या पायथ्याशी वसलेले आहे.

नावाचे कारण: बालाघाटात उगम पावणाऱ्या नीलकंठा नदीमुळे या महादेवाला नीलकंठेश्वर असे नाव पडले आहे.

आख्यायिका:या मंदिरातील शिवलिंगाची स्थापना प्रभू श्रीरामांनी केली असल्याची आख्यायिका आहे.

श्रद्धा:येथील शिवलिंग जागृत असून, त्याच्या दर्शनाने मनोकामना पूर्ण होतात, अशी भाविकांची दृढ श्रद्धा आहे.

https://maps.app.goo.gl/NgbgTWf7ZkMBqrjA7

माळशिरस

सयाजीराजे पार्क, अकलूज



https://maps.app.goo.gl/TPzjEdVPPhQFP1kz7

अकलूजमधील सयाजीराजे वॉटर पार्क हे महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या जलचर साहसी उद्यानांपैकी एक आहे आणि जर तुम्हाला रोमांचक स्लाइड्स आणि थंडगार स्प्लॅश हवे असतील तर शहराच्या उष्णतेपासून वाचण्यासाठी हे एक उत्तम ठिकाण आहे. अकलूजपासून ५ किलोमीटर अंतरावर आणि आनंदी गणेश मंदिराच्या वाटेवर असलेले हे उद्यान पुणे, मुंबई आणि सोलापूर येथील साहसी लोकांना आकर्षित करते जे त्यांच्या प्रियजनांसोबत उन्हाळ्याचा आनंद घेण्यास उत्सुक आहेत. सर्व वयोगटातील लोकांसाठी योग्य असलेल्या अनेक क्रियाकलापांसाठी सज्ज व्हा, ज्यात उत्साहवर्धक स्लाइड्स, मनोरंजक वेव्ह पूल आणि शांत मुलांसाठी क्षेत्रे यांचा समावेश आहे. सयाजीराजे वॉटर पार्क जलचर अनुभवांनी भरलेल्या अविस्मरणीय दिवसाची हमी देते.


अर्धनारी नटेश्वर मंदिर



सोलापूर जिल्ह्यातल्या माळिशरस तालुक्यातील वेळापूर येथील हरनारेश्वर महादेव मंदिर हे अर्धनारीनटेश्वराचे मंदिर आहे. हेमाडपंथी वास्तु-पद्धतीचे हे बांधकाम असून यादव राजा रामचंद्र (१२७१ ते १३१०) यांच्या बद्दलचे शिलालेख या देवळाच्या भिंतींवर कोरलेले आहेत. मराठी आणि संस्कृत भाषेत असणाऱ्या या शिलालेखांत देवराव यांच्या नावाचा उल्लेख आहे. श्री अर्धनारी नटेश वर ग्रामदैवताची यात्रा चैत्र पौर्णिमेस होते. शुद्ध पंचमीस हळदी, अष्टमीस लग्न व पौर्णिमेस वरात आणि वद्य अष्टमीस सोळावी असा महोत्सव दरवर्षी साजरा केला जातो. या कालावधीत विविध स्पर्धेचे आयोजन केले जाते. यादवकालीन या मंदिरामुळे वेळापूरला अनन्य साधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहे.

https://maps.app.goo.gl/ejfWTjPYU1jihcEj9

गिरजणी धबधबा



https://maps.app.goo.gl/A4FSEJD53RJL2etV9

गिरजणी धबधबा हा अकलूजजवळ माळिशरस तालुक्यात पाणीव गावाजवळ असलेला एक निसर्गरम्य ठिकाण आहे. हा धबधबा पाणीव आणि गिरजनी येथील छोटे तलाव भरल्यावर वाहू लागतो. पावसाळ्यात या धबधब्याचे विहंगम दृश्य पाहायला मिळते आणि स्थानिक लोक आणि पर्यटकांमध्ये हा एक आकर्षणाचा केंद्रबिंदू बनला आहे. पावसाळ्यातील हिरवळ आणि धबधब्याचे विहंगम दृश्य पाहणे हा या ठिकाणाचा मुख्य अनुभव आहे. धबधबा ज्या लहान तलावांमुळे तयार होतो, ते तलाव देखील पाहण्यासारखे आहेत.

महाळूंग- यमाई देवीचे मंदिर



महाळूंग येथे असलेले यमाई देवीचे मंदिर हे एक हेमाडपंथी पद्धतीचे प्राचीन आणि प्रसिद्ध मंदिर आहे, जे सोलापूर जिल्ह्यातील माळिशरस तालुक्यात आहे. हे मंदिर अकलूज आणि श्रीपूरच्या मार्गावर असून, यमाई देवीला गावाची ग्रामदेवता आणि संकटांपासून रक्षण करणारी माता मानले जाते. हे मंदिर यमाई देवीचे दुसरे महत्त्वाचे स्थान मानले जाते, जिथे औंधनंतर तिची पूजा केली जाते. देवीला पार्वतीचा अवतार मानले जाते आणि महाराष्ट्रातील तुळजापूरच्या देवीनंतर या देवीचे दर्शन महत्त्वाचे मानले जाते.

https://maps.app.goo.gl/7wE1NC16NAJpMSZf9

नीरा भीमा संगम मंदिर - नीरा नरसिंह



https://maps.app.goo.gl/aM98MQVwKuG7g6uc8

नीरा भीमा संगम, ज्याला नीरा नरसिंहपूर असेही म्हणतात, हे नीरा आणि भीमा नद्यांच्या संगमावर वसलेले एक पवित्र ठिकाण आहे, जे पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांच्या सीमेवर आहे. येथे श्री लक्ष्मी नरसिंहाचे प्राचीन मंदिर आहे आणि हे ठिकाण शैव-वैष्णव एकात्मतेचे प्रतीक मानले जाते. नीरा आणि भीमा नद्यांच्या संगमानंतर त्यांचे रूपांतर चंद्रभागा नदीत होते आणि ती पंढरपूरच्या दिशेने पुढे जाते. इंदापूर, माळिशरस, माढा या तीन तालुक्यांच्या सीमारेषांच्या हद्दीत नीरा आणि भिमा या नद्यांचा संगम होतो. पश्चिमेकडून वाहत येऊन पंढरपूरच्या दिशेने कूच करणारी भीमा पश्चिमेकडून वाहत येऊन पूर्वेला जाणा-या नीरा नदीला आलिंगन देते. संगम झाल्यानंतर भीमा-निरा नदीचे रूपांतर चंद्रभागा नदीत होते. ती चंद्रभागा पुढे पंढरपूरच्या दिशेने वाहते.

श्री महालक्ष्मी मंदिर - पिलीव



श्री महालक्ष्मी मंदिर, पिलीव - हे पिलीव गावातील एक प्रसिद्ध आणि जागृत महालक्ष्मी मंदिर आहे, ज्याची स्थापना सुमारे ३०० वर्षांपूर्वी झाली होती. हे मंदिर सोलापूर जिल्ह्यात आहे आणि दरवर्षी अनेक भाविक येथे दर्शनासाठी येतात. या मंदिराचे व्यवस्थापन आता सोलापूर जिल्हा प्रशासनांतर्गत केले जाते. पिलीव गावामध्ये या मंदिरासोबत एक किल्ला देखील आहे, जो या परिसराचा एक ऐतिहासिक भाग आहे.

https://maps.app.goo.gl/iCUo2kXW9B18qNHg6

मंगळवेढा


संत दामाजी मंदिर



https://maps.app.goo.gl/gMNEFe6MY9vDKVpCA

हे मंदिर सोलापूर जिल्ह्यामध्ये, पंढरपूरपासून सुमारे २५ किमी अंतरावर असलेल्या मंगळवेढ्यामध्ये आहे. संत दामाजी पंतांना मंगळवेढ्याचे ग्रामदैवत मानले जाते आणि हे मंदिर वारकऱ्यांसाठी एक महत्त्वाचे स्थान आहे. सध्या गाभाऱ्यात श्री विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती आणि दामाजीपंतांची समाधी आहे, तर मंदिरामागे त्यांची जुनी समाधीदेखील आहे. मंदिरात दररोज सकाळी पूजा, सायंकाळी धुपारती आणि दामाजी आख्यानाचे वाचन केले जाते. तसेच गुरुवारी भजन, एकादशीला गीता पारायण व हरिजागर असे कार्यक्रम आयोजित केले जातात. मंगळवेढा हे संत कान्होपात्रा आणि संत दामाजी यांच्या वास्तव्याने पुनीत झालेले गाव आहे. या शहराला प्राचीन काळात महामंडलेश्वर आणि मंगलवेष्टक या नावांनीही ओळखले जात असे.

संत चोखामेळा समाधी



संत चोखामेळा यांचे निधन मंगळवेढा येथे झाले आणि तेथे त्यांच्या मृतदेहाचे अवशेष (अस्थी) सापडले, त्यामुळे मंगळवेढ्यात त्यांचे एक समाधी मंदिर आहे. तथापि, संत चोखामेळा यांची अंतिम समाधी पंढरपूर येथे विठ्ठल मंदिराच्या महाद्वाराजवळ आहे. मंगळवेढ्यातील मंदिर हे चोखामेळांच्या स्मृतीप्रित्यर्थ उभारलेले स्मारक आहे, तर पंढरपूर येथील समाधी ही त्यांची अंतिम विश्रांतीची जागा आहे.

मंगळवेढ्यातील समाधी

स्थान: संत चोखामेळा यांचे निधन मंगळवेढ्यात झाले, जिथे काम चालू असताना भिंत कोसळल्याने त्यांचा मृत्यू झाला होता.

स्वरूप: या समाधीचे मंदिर हे एका उंच चौथऱ्यावर बांधलेल्या चार खांबांच्या घुमटीसारखे आहे, ज्याच्या आत चोखोबांच्या पादुका आहेत.

उद्देश: हे स्मारक चोखामेळांच्या स्मृतीप्रित्यर्थ उभारण्यात आले आहे, जिथे त्यांची पूजा केली जाते.

https://maps.app.goo.gl/8MndvENW6KhBQWBa9

प्राचीन सिद्धेश्वर मंदिर माचणूर



https://maps.app.goo.gl/VvmLhMSLzV3GTuL16

माचणूर येथील प्राचीन सिद्धेश्वर मंदिर हे सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यात भिमा नदीच्या काठावर असलेले हेमाडपंती स्थापत्यशैलीचे उत्तम उदाहरण आहे. हे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असून, या ठिकाणी लाखोंच्या संख्येने भाविक आणि पर्यटक श्रावण महिना आणि महाशिवरात्रीला भेट देतात. राणी अहिल्यादेवी यांनी बांधलेला मोठा घाट मंदिरासमोर आहे.

मंदिराची वैशिष्ट्ये:

स्थान: हे मंदिर भिमा नदीच्या काठावर वसलेले आहे आणि या परिसराला 'नाथांचे ठाणे' असेही म्हटले जाते.

स्थापत्य: हे मंदिर हेमाडपंती स्थापत्यशैलीचे उदाहरण आहे, ज्यात मोठ्या शिळांचा वापर करून बांधकाम केलेले आहे.

धार्मिक महत्त्व: हे दत्तपद क्षेत्र म्हणून ओळखले जाते आणि स्कंधपुराणातही याचा उल्लेख आढळतो. अक्कलकोटचे स्वामी समर्थ आणि धनकवडीचे शंकर महाराज यांनीही येथे काही काळ वास्तव्य केले होते, असे मानले जाते.

राणी अहिल्यादेवींचा घाट: मंदिरासमोर नदीकाठी राणी अहिल्यादेवी यांनी बांधलेला एक मोठा घाट आहे.

संत कान्होपात्रा मंदिर



महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथे वसलेले संत कान्होपात्रा मंदिर हे एक अत्यंत पवित्र तीर्थस्थान आहे. संत कान्होपात्रा या संत परंपरेतील एक महान संत होत्या, ज्या आपल्या भक्तिभाव, साधना आणि अध्यात्मिक विचारांसाठी ओळखल्या जातात. त्यांचे जीवन ईश्वरभक्तीत आणि समाजसेवेत व्यतीत झाले.

हे मंदिर त्यांच्याच आठवणीसाठी बांधले गेले असून, येथे देशभरातील अनेक भक्तगण येऊन आपली श्रद्धा व्यक्त करतात. मंदिराच्या परिसरात संत कान्होपात्रांच्या शिकवणींची गाथा सांगणाऱ्या विविध शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना पाहायला मिळतो. मंदिराच्या शांत आणि पवित्र वातावरणामुळे येथे येणाऱ्या भक्तांना भक्ती आणि शांतीचा अनुभव येतो. संत कान्होपात्रांच्या जीवनावर आधारित कथा आणि गीतांमुळे त्यांचे मंदिर आजही भक्तगणांना आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रेरित करते.

https://maps.app.goo.gl/GNaC969D6t3KxNDn7

श्री जटाशंकर मंदिर माचनूर



https://maps.app.goo.gl/VegQrXjMU2hCLVKfA

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील माचनूर येथे भिमा नदीच्या पात्रात जटाशंकर मंदिर आहे, जे सिध्देश्वर मंदिराच्या जवळच आहे आणि या मंदिरातील नयनरम्य दृश्यामुळे भाविक व पर्यटक आकर्षित होतात, असे एका ऐरझरश्र लेखातून समजते. जटाशंकर मंदिर हे पाण्यातील मंदिर असून, ते भाविकांसाठी एक खास आकर्षण ठरले आहे आणि दररोज भाविक व पर्यटक या मंदिराचे दर्शन घेण्यासाठी येतात.

जटाशंकर मंदिर माचनूरबद्दल: स्थान: हे मंदिर सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यात, भिमा नदीच्या (चंद्रभागा) काठावर वसलेले आहे. वैशिष्ट्य: भिमा नदीच्या पात्रात असलेले हे मंदिर पाण्यातील असल्यामुळे खास आहे आणि भाविक या नयनरम्य मंदिराच्या दर्शनासाठी येतात. धार्मिक महत्त्व: या मंदिरासोबतच माचनूरमध्ये सिद्धेश्वर मंदिर देखील आहे. हे संपूर्ण क्षेत्र भक्तांसाठी आध्यात्मिक महत्त्व असलेले ठिकाण आहे. यात्रेकरू आणि पर्यटक: महाशिवरात्र आणि श्रावण महिन्यात अनेक भाविक आणि पर्यटक या ठिकाणी दर्शनासाठी मोठ्या संख्येने जमतात. धार्मिक पर्यटन: जटाशंकर मंदिराच्या पाण्यातील असण्यामुळे व नयनरम्य दृश्यामुळे या भागातील धार्मिक पर्यटनाला चालना मिळाली आहे.

श्री काशी विश्वेश्वर मंदिर



मंगळवेढ्यातील श्री काशी विश्वेश्वर मंदिर हे एक प्राचीन हेमाडपंथी शैलीतील मंदिर आहे आणि ते सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांपैकी एक आहे, जिथे श्रावण महिन्यात भाविकांची विशेष गर्दी असते. हे मंदिर हेमाडपंथी स्थापत्यशैलीचे असून ते मंगळवेढ्यातील एक प्राचीन आणि महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. श्रावण महिन्यात या मंदिराला भेट देण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने येतात.हे मंगळवेढा शहराच्या धार्मिक आणि ऐतिहासिक वारशाचा एक भाग आहे. या मंदिराच्या प्राचीन वास्तुकलेमुळे आणि धार्मिक महत्त्वादरम्यान भाविक या स्थळाला भेट देतात.

https://maps.app.goo.gl/3Xz9VueivWwHhFnM8

श्रीकृष्ण तलाव



https://maps.app.goo.gl/VegQrXjMU2hCLVKfA

श्रीकृष्ण तलाव हे मंगळवेढ्याच्या पश्चिमेला असलेले एक प्राचीन ठिकाण आहे, ज्याच्या मध्यभागी गोपाळकृष्णाचे मंदिर होते. १९७२ च्या दुष्काळात या तलावाचे उत्खनन करण्यात आले आणि या ठिकाणी शिवाजी महाराजांनी देखील भेट दिली आहे, हे या परिसराचे ऐतिहासिक महत्त्व दर्शवते. हा परिसर पर्यटनस्थळ म्हणून विकसित होण्याची क्षमता असून, आता या ठिकाणी वृक्षारोपण आणि इतर पर्यावरणीय कार्यक्रमही राबवले जातात.

ऐतिहासिक महत्त्व:

हा तलाव फार प्राचीन काळातील असून, त्यामागे कोणी बांधकाम केले याचा पुरावा मिळत नाही.

तलावाच्या मध्यभागी गोपाळकृष्णाचे एक सुंदर मंदिर होते आणि एका विहिरीतून भुयारी मार्ग या मंदिरापर्यंत जात असे, अशी लोककथा आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिणेकडील मोहिमेदरम्यान या तलावाला भेट दिली होती, या घटनेमुळे या ठिकाणाचे ऐतिहासिक महत्त्व वाढते.

सांगोला

वाडेगाव - नदी संगम - जुने हेमाडपंथी मंदिर



सांगोला तालुक्यातील वाढेगाव येथे माण नदी आणि अप्रूका नदी यांचा संगम होतो, जो निसर्गरम्य असून पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग आहे. माण नदी, ज्याला माणगंगा नदी असेही म्हणतात, ही एक प्रमुख नदी आहे जीभीमा नदीची उपनदी आहे. वाढेगाव येथील हे ठिकाण, जिथे तीन नद्यांचा संगम असतो, हे सांगोला परिसरातील एक महत्त्वाचे भौगोलिक आणि पर्यटन स्थळ मानले जाते.

प्रवासाची ओळख: माण नदी ही सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात उगम पावते आणि सोलापूर जिल्ह्याच्या सांगोला तालुक्यातून वाहत येते. तीभीमा नदीला मिळते.

वाढेगावचा संगम: वाढेगाव येथे माण नदी अप्रूका नदीला मिळते. या संगमामुळे परिसराला निसर्गरम्यता प्राप्त झाली आहे.

पर्यटन क्षमता: माणगंगा नदी आणि तिच्या परिसराचे जतन व संवर्धन केले गेल्यास, वाढेगाव आणि आजूबाजूच्या प्रदेशाचा विकास एक पर्यटनस्थळ म्हणून होऊ शकतो.

संवर्धनाचे प्रयत्न: माणगंगा नदीच्या पुनरुज्जीवनासाठी माणगंगा भ्रमणसेवा बहुउद्देशिय संस्थेने काम केले आहे. तसेच, नदीपात्रात पाणीसाठा वाढवण्यासाठी आणि दुष्काळावर मात करण्यासाठी बंधारे बांधले जात आहेत.

https://maps.app.goo.gl/Ei3BYFo38X12P9pW8

बुदिहाळ इमारत - ब्रिटिश कालीन बुद्ध्याळ तळे




ब्रिटिशानी दुष्काळी भागात माने गंगा नदीवर राजेवाडी तलाव आणि बेलवण नदीवर बुदिहाळ तलाव बांधले होते. भिवघाट आणि शुकाचार्य यामधून लहान-लहान नाले वाहत येऊन घाट माथ्याखाली एकत्र मिळतात. करगणी मध्ये रामघाट नाला आणि शेटफळे मध्ये वेलवण नदीमध्ये रूपांतर होते. या नदीवर सांगोला तालुक्याच्या सीमेवर १९०२ मध्ये ब्रिटिशांनी बुद्धेहाळ तलाव बांधला असून याचे राहिलेले का १९५७ मध्ये पूर्ण झाले आहे. या तलावाचा भराव कोल्हापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात असून पाणी साठा सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यात होतो.

तलावाची पाणीसाठा क्षमता ११३२ द.ल. घनफूट आहे तर दहा गावातील ४५२१ हेक्टर क्षेत्राला लाभ होतो. या तलावावर दहा गावच्या सतरा पाणीवापर संस्था कामकाज पाहतात. तलावामध्ये टेंभू योजनेचे ही पाणी येते. आटपाडी तालुक्यातील माडगुळे आणि शेटफळे परिसरातील क्षेत्राला या पाण्याचा लाभ होतो.

https://maps.app.goo.gl/PFKS47gWs8wMa2EM9

ऐतिहासिक अंबिका देवी मंदिर




अंबिका मंदिर हे सोलापूरच्या सांगोला शहरातील हिंदू मंदिर आहे. हे मंदिर १४ व्या शतकातील आहे असे सांगितले जाते. एकाच सिंहासनावर अंबिका माता, तुकाई (तुळजाभवानी) आणि औंधची यमाईदेवी येथे विराजमान आहे, त्यामुळे याला विशेष धार्मिक महत्त्व आहे. सांगोला शहराचे हे ग्रामदैवत आहे.

या मंदिराचे सांगोला आणि माणदेशाच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. माणदेशावर राज्य करणाऱ्यांमध्ये निजामशहा, आदिलशहा, मुघल, मराठे, पेशवे– आणि पुढे ब्रिटिशांचा समावेश होतो. अंबिका मंदिर या सर्व ऐतिहासिक घडामोडींमध्ये महत्त्वाच्या स्थानी होते. १४ व्या शतकात मंदिर बांधले गेले असावे, असा लोकांचा दावा आहे. मराठ्यांच्या इतिहासात छत्रपती राजाराम यांना नामधारी केले गेले आणि खरी सत्ता पेशव्यांकडे गेली. ही ऐतिहासिक घटनदेखील याच मंदिरात घडल्याचा दावा केला जातो. मूळ अंबिका मंदिर यादवकालीन आहे. त्या काळात इथे फक्त मंदिराचा गाभारा होता. पुढच्या काळात मंदिराचा जीर्णोद्धार झाला. त्यानंतर येथे सभामंडप तसेच कमान बांधण्यात आली. अंबिका माता ही सांगोला गावाचे मूळ दैवत होती. पुढे जेव्हा या भागावर मराठ्यांची सत्ता आली तेव्हा या मंदिरात तुळजाभवानीची मूर्तीची स्थापना केली गेली. औंधच्या यमाई मातेची मूर्ती पेशवाईच्या काळात स्थापन केल्याचा दावा केला जातो, पण अजून या दाव्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याचे इतिहासकार सांगतात.

https://maps.app.goo.gl/EgrtgUwazX6gMWfm8

सांगोला – भुईकोट किल्ला



सोलापूर जिल्ह्यातील सांगोला या तालुक्याच्या गावी एक भुईकोट किल्ला होता. सद्यस्थितीत एकच बुरूज पहायला मिळतो. सांगोला हे पंढरपूरपासून साधारण ३० कि.मी. अंतरावर आहे. सांगोला हे पंधराव्या शतकाच्या आसपास इंगोले सरदारांनी वसवले. बाबाजी लखमार्ज इंगोले आणि त्यांची पाच मुले यांनी माणगंगा नदीपासून जवळच हे गाव वसवले आणि किल्ले सांगोला बांधला. हे सहा इंगोले होते यांनी गाव वसवले म्हणून गावाला सांगोले असं नाव पडले. इंगोलेंना आदिलशाहीकडून देशमुखी मिळाली होती. आदिलशहाने त्यांना ७२ गावे वतन म्हणून दिली होती. अफजलखानाच्या वधानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी वाई ते कोल्हापूरचा सगळा परिसर ताब्यात मिळवला. तेव्हा नेताजी पालकरांनी इ.स. १४ नोव्हेंबर १६५९ ला हा किल्ला ताब्यात घेतला. पुन्हा इ.स. १६६३ मध्ये आदिलशहाने हा किल्ला मिळवला. नंतर इ.स.१६६५ च्या डिसेंबरमध्ये मिर्झाराजे जयसिंग सोबत महाराजांनी किल्ला जिंकून घेतला. इ.स. १६७९ ला किल्ला इंगोले सरदारांना भेट दिला. पुढे दिलेरखान पठाण या मोगल सरदाराच्या ताब्यात गेला परत हंबीरराव मोहितेंनी तो किल्ला जिंकला. इ.स. १६९० पासून किल्ला मोगली राजवटीखाली आला. इ.स. १७५० मध्ये बाळाजी बाजीराव यांस तारांराणींचे सरदार यमाजीपंत शिवदेव यांकडून विरोध झाला. इ.स. १८०२ मध्ये होळकरांच्या पठाणांनी किल्ल्याची लूट केली.

https://maps.app.goo.gl/6BNR8qLWs4HBVSxV6